10 JAN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामॅरेथॉनसाठी यांचेही राबले हात...

## स्वयंसेवी संस्था, शाळा यांचे योगदान : शिवाजी विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाचीही तप्तर सेवा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लोकमतच्या महामॅरेथॉन स्पर्धेसाठी अनेक स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींनी सहकार्याचे हात पुढे केले. त्यांच्या या योगदानामुळेच ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, डेकोरेशन आणि इव्हेंटस, इंजिनिअर्स वर्क्स, फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफर्स, वाहतूक व्यवस्था, निवेदन करणारे अँकर्स, रेडिओ जॉकी, झुंबा पथक, शाळा, महाविद्यालयांतील व्यक्तींचेही हात राबले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मोठी जबाबदारी सांभाळली. संचालक अभय जायभाय यांच्या नेतृत्वाखाली राजाराम, महावीर, विवेकानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी यासाठी हातभार लावला. या स्वयंसेवकांनी खूप चांगले काम केले. काहीजण तर स्वतःच्या



कोल्हापुरात रविवारी पार पडलेल्या लोकमत महामॅरेथॉनमध्ये शेफ दिग्विजय आणि अश्विनी भोसले, तसेच त्यांच्या टीमने उत्कृष्ट अल्पोपहार पुरविला. (छाया : आदित्य वेल्हाळ)

वाहनाने मॅरेथॉनच्या वॉटर स्टेशन आणि पंक्चर पॉइंटवर पोहोचून तेथील कामकाज सुरळीत राहील, याकडे आवर्जून लक्ष देत होते.

रेडिओ मिर्चीचे रेडिओ जॉकी मनिष आपटे आणि पल्लवी, गुरमूर डेकोरेशन आणि इव्हेंट्सचे राजेंद्र गुरमूर, उद्योगसेवा इंजिनिअरिंग अँड वर्क्सचे सचिन साळोखे, ए-वन दिलीप बलून डेकोरेटर्सचे यासीन मदारी, स्पर्धकांमध्ये उत्साह आणि जोश वाढविणारे कौशल्यपूर्ण निवेदन करणारे अँकर अक्षय डोंगरे, भाग्यश्री शिंदे, गणेश साउंड सर्व्हिसेसचे विजय यादव, कन्सेप्ट फोटोग्राफी अँड व्हिडीओग्राफीचे सुरेश मोरे, अंबारिका ट्रान्सपोर्टचे पवन चव्हाण, नारायणी फूड्सचे नंदकुमार प्रभू, शेफ दिग्विजय आणि अश्विनी भोसले, तसेच त्यांची टीम, झुंबा नृत्याचा ग्रुप, रणजित भोसले, अमोल घोगडे, विक्रांत देसाई, शाहूपुरी विद्यालय, साळोखेनगर, विगब्योर इंटरनॅशनल स्कूल, हनुमंतराव चाटे स्कूल, भुदरगड तालुक्यातील मडिलगे बुद्रुक विद्या मंदिरसारख्या शाळा, शिवाजी विद्यापीठ, भारती विद्यापीठ, विवेकानंद कॉलेज, महावीर कॉलेज, आदी महाविद्यालयांचे सहकार्य लाभले.

लोकमतची महामॅरेथॉन म्हणजे, युवकांमध्ये प्रेरणा आणि उत्साह निर्माण करणारी एक उत्तम आयोजन केलेली महामॅरेथॉन होय. या स्पर्धेला लोकांचा उत्तम आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशा प्रकारच्या जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करणाऱ्या 'लोकमत'चे विशेष अभिनंदन.



- **अजय जायभाय**, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2023
लोकमत



शिवाजी विद्यापीठ मुख्य इमारतीच्या आवारात मजले (ता. हातकणंगले) जिजाऊ बालविकास मंदिरच्या विद्यार्थ्यांनी लेझीम सादर करून वाहवा मिळविली.

महासत्ता

# योग, निसर्गोपचार परिषदेचे आयोजन

कोल्हापूर, ता.८ (प्रतिनिधी)

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने ता. २० जानेवारी रोजी एकदिवशीय राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात करण्यात आले आहे.

या परिषदेत निसर्गोपचार, ॲक्युप्रेशर, योग, आहार या विषयांवर व्याख्याने व प्रात्यक्षिके होणार आहेत. राज्यातील तज्ञ मार्गदर्शक, डॉक्टर, निसर्गोपचाराचे अभ्यासक, विद्यार्थी परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. तरी आरोग्याबाबत सजग असणारे नागरिक, अभ्यासक, विद्यार्थी, थेरपिस्ट यांनी परिषदेसाठी ता. १५ जानेवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी केले आहे.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात कला-क्रीडाविषयक उपक्रम उत्साहात

**कोल्हापूर, ता.८(प्रतिनिधी)**

..............................

कोल्हापूरचे श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस शिवाजी विद्यापीठाने कला, क्रीडाविषयक उपक्रम आयोजित करून मोठ्या उत्साहात साजरा केला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी शाहू छत्रपती महाराजांना दीर्घायुष्य लाभो, अशा सदिच्छा याप्रसंगी दिल्या.

श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने स्वरार्पण या सांगीतिक कार्यक्रमाचे राजर्षी शाहू सभागृहात सादरीकरण केले. विभागाच्या डॉ. शिवानी ढेरे यांच्यासह प्रियांका मिरजकर, प्रतीक्षा पोवार, हर्षदा परीट, नम्रता पंडित, अनिकेत निर्मळे या विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत रामदास यांनी रचलेल्या अभंगासह अनेक नवी-जुनी मराठी हिंदी, गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, निखिल भगत यांच्यासह सहयोगी शिक्षकांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

महासत्ता

# विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेमध्ये वारणा महाविद्यालय व नाईट कॉलेज अजिंक्य

**कोल्हापूर ता.८ (प्रतिनिधी)-**

..................

शिवाजी विद्यापीठ आयोजित शाहू महाराज छत्रपती यांच्या अमृत महोत्सव वाढदिवसानिमित्त विद्यापीठ स्तरीय बास्केटबॉल पुरुष व महिला स्पर्धेचे आयोजन क्रीडा महर्षी मेघनाथ क्रीडा संकुल मध्ये आयोजित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सांगली सातारा कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांमधून आठ मुलांचे व सहा मुलींचे संघाने सहभाग घेतला. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये महिलांच्या गटामध्ये प्रथम क्रमांक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणा, द्वितीय क्रमांक कन्या महाविद्यालय मिरज आणि तृतीय क्रमांक दत्ताजीराव कदम आर्ट्स कॉमर्स सायन्स महाविद्यालय इचलकरंजी यांनी पटकाविला. पुरुषांचा सामन्यामध्ये नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स प्रथम क्रमांक देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स द्वितीय क्रमांक आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणा याने तृतीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे बक्षीस समारंभ शिवाजी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, प्रा बापूसाहेब सरगर, प्रा. किरण पाटील प्रा. निलेश पाटील उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन पृथ्वीराज सरनाईक, केदार सुतार, अमित दलाल, उदय पाटील, विनायक साळुंखे, विजय इंगवले, विजय कांबळे धीरज पाटील, सुनील देसाई, आनंदा तळेकर यांनी केले.

महासत्ता

# अखिल भारतीय मैदानी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना

कोल्हापूर ता.७ (प्रतिनिधी)-

तामिळनाडू फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस युनिव्हर्सिटीमध्ये दि.९ते१२ जानेवारी २०२३ रोजी होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ (साऊथ वेस्ट) मैदानी स्पर्धेसाठी आज शिवाजी विद्यापीठाचा ४५ खेळाडूंचा संघ रवाना झाला.

२४ व्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी केलेले खेळाडू या संघात आहेत. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. प्रशांत पाटील, डॉ.राहुल मगदुम, प्रा.सुरेश धुरे, प्रा. आर.टी. पाटिल, डॉ. इब्राहिम मुल्ला, डॉ. रूपाली कांबळे उपस्थित होते.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत जतच्या दोन सख्ख्या बहिणींचे सुयश

जत,ता.८(प्रतिनिधी)-

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे राजे रामराव महाविद्यालय, जत येथील पदार्थविज्ञान विभागातील एम.एस्सी.भाग २ मधील विद्यार्थीनी कु. ऋतुजा अनिल एकुंडे हिने शिवाजी विद्यापीठाने मार्च २०२२ मध्ये घेतलेल्या एम. एस्सी. कोर्स च्या परीक्षेमध्ये भौतिकशास्त्र या विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळवला आहे.





ऋतुजाची सख्खी लहान बहिणी, कु. तनुजा अनिल एकुंडे हिने शिवाजी विद्यापीठाने मार्च २०२२ मध्ये घेतलेल्या बी. एस्सी. कोर्स च्या परीक्षेमध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक मिळवला आहे. कु. ऋतुजाला पदार्थविज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठामध्ये पीएच.डी. ला प्रवेश मिळाला आहे तर कु. तनुजा हि सध्या पदार्थविज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठामध्ये एम. एस्सी. चे शिक्षण घेत आहे.

पुढारी



# पदवी, पदव्युत्तर २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्र परीक्षेअंतर्गत सोमवारी २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या.

विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. सोमवारी बीए., बी.टेक., एम.एस्सी., बी.फार्म., एम.ए., मास्टर ऑफ लॉ, बीई, बीआयडी, एम.ए. (भूगोल), एम.ए. (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम), एम (आर्किटेक्चर) अशा २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी




# कुस्तीत नेहा चौगले, स्वाती शिंदेला कास्य

**मुरगूड :** कर्जत ( अहमदनगर ) येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय ( साई ) कुस्ती संकुल, मुरगूड व जेएसडब्ल्यू जिंदाल ग्रुपच्या कुस्तीगीर नेहा किरण चौगुले ( ५० किलो ) व स्वाती संजय शिंदे ( ५३ किलो ) यांनी कास्यपदक पटकावले. या मल्लांना आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच दादासो लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर, दयानंद खतकर, सागर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

10 JAN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

# अविचारी विकास व जोशीमठ

डॉ. व्ही.एन. शिंदे

जोशीमठ. उत्तराखंड राज्यातील चमोली जिल्ह्यातील एक गाव. हिमालयाच्या पर्वतरांगामध्ये समुद्रसपाटीपासून ६१०० फूट उंचीवर वसलेले निसर्गसंपन्न गाव. ते पूर्वी कात्युरी राजघराण्याच्या राजधानीचे गाव होते. येथून बद्रीनाथ मंदिर केवळ ३२ किलोमीटरवर. याच गावात आद्य शंकराचार्यांनी चार मठांपैकी जोतिर्मठाची स्थापना केली. त्यामुळे जोशीमठचे धार्मिक महत्त्व वाढले. गावात साधारण चार हजार कुटुंबे राहतात. गावाची लोकसंख्या १६ हजारच्या आसपास. चढउतारावर वसलेले गाव सुखाने जगत होते. या गावाला पुराणकाळापासून मोठे महत्त्व लाभले आहे. शंकराचार्यांनी येथे तप केले. हनुमान या ठिकाणी संजीवनी बुटीच्या शोधात आले होते, असेही मानतात. भगवान नरसिंहानी याच ठिकाण तपश्चर्या केली अशीही धारणा आहे. अज्ञातवासानंतर स्वर्गाकडे जाताना पांडव या ठिकाणी आल्याचे मानतात. शीखांचे पवित्र हेमकुंड हे धर्मस्थळही जोशीमठपासून जवळच आहे. नरसिंह, शंकराचार्य मठ, गडी भवानीदेवी मंदिर अशा अनेक मंदिरांमुळे आणि अन्य धर्मस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यावर वसलेल्या गावाला मोठे महत्त्व लाभले.

जोशीमठला हिमालयाचे प्रवेशद्वार अशीही ओळख आहे. संरक्षणदृष्ट्याही गावाला मोठे महत्त्व आहे. भारत चीन सीमेवरील हे महत्त्वाचे गाव. येथे सैन्याचा मोठा तळ आहे. इंडो-तिबेटीयन बॉर्डर फोर्ससाठीही हे महत्त्वाचे गाव आहे. तोपर्यंत केवळ पर्यटकांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे गाव होते. या ठिकाणी हिवाळ्यानंतर दऱ्याखोऱ्यात फुलणाऱ्या फुलांमुळे या भागाला 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' अशी ओळख मिळाली आहे. या गावाबद्दल सर्वसामान्यांना प्रथम माहिती झाली २०२१ मध्ये. त्यावेळी बर्फाचे कडे तुटून नद्यांना मोठा पूर आला. या पुरामध्ये आजूबाजूच्या भागात असणारे तलावही फुटले आणि जोशीमठ गावालाही तडाखा बसला.

आज जोशीमठ केवळ देशात नव्हे; तर जागतिक पातळीवर चर्चेत आले आहे. चार हजारच्या आसपास घरे असणाऱ्या गावातील सहाशेपेक्षा जास्त घरांना तडे गेले आहेत. या घरांमध्ये राहणे म्हणजे मृत्यूला कुशीत घेऊन झोपण्यासारखे आहे. याचे गांभीर्य ओळखून लेख लिहिताना ६०५ घरातील लोकांना प्रशासनाने सुरक्षित स्थळी हलवले आहे. निव्वळ घरांनाच तडे गेलेले नाहीत, तर रस्त्यावरही मोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यातून पाणी येत आहे. २०२१ पासून जोशीमठ आणि आजूबाजूच्या परिसरात दरडी कोसळत आहेत. आज अनेकांची घरे राहण्यायोग्य राहिली नाहीत. त्यांनी शेजाऱ्यांकडे तात्पुरता आसरा घेतला. मात्र, पर्यटकांचा यात्रेतील शेवटचा किंवा यात्रेनंतरचा पहिला टप्पा असलेल्या गावात मूळ निवासींनाच राहण्यायोग्य परिस्थिती राहिली नाही.

ही परिस्थिती उद्‌भवण्यामागे अनेक कारणे आहेत. २०२२ मध्ये 'पुण्यनगरी'च्या ११ ऑक्टोबरच्या अंकामध्ये सर्व खंड उत्तरेकडे कसे सरकत आहेत, याची माहिती प्रसिद्ध झाली आहे. सर्व संशोधकही ते मान्य करतात. त्यामुळे हिमालयाच्या पर्वतरांगांवर त्याचा परिणाम जाणवणार हे निश्चित. मात्र, हा परिणाम इतक्या तीव्रतेने जाणवू लागला आहे त्याचे कारण मानवी आहे. मानवाने या भागामध्ये जी विकास कामे हाती घेतली, ती निसर्गामध्ये मोठ्या प्रमाणात ढवळाढवळ करणारी आहेत. त्यामुळे परिणाम किती तरी पटीने वाढला आहे. या भागात प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संशोधकांनी यासाठी तीन कारणे दिली आहेत. यातील पहिले आणि प्रमुख कारण म्हणजे अलकनंदा नदीमुळे होत असलेली जमिनीची धूप हे आहे. अलकनंदा नदीच्या तीरावरील टेकड्यांवर जोशीमठ हे गाव वसलेले आहे. या



घराच्या भिंतींना गेलेले तडे दाखवताना जोशीमठ येथील वयस्कर नागरिक.

ठिकाणच्या टेकड्या मातीच्या आहेत. या टेकड्या खाली होत असलेल्या जमिनीच्या धूपीमुळे हळूहळू खाली सरकत आहेत. त्याचा परिणाम रस्ते आणि घरांना भेगा पडण्यामध्ये दिसून येत होता. संशोधकांनी शोधलेले दुसरे कारण आहे, या शहरातील ड्रेनेजची व्यवस्था. सांडपाणी व्यवस्थित खाली जात नाही. ते तेथील मातीमध्ये मोठ्या प्रमाणात मुरते. पावसाच्या आणि सांडपाण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने मातीमध्ये बीळ तयार होते. ते मोठे होत जाते आणि एक दिवस तेथे जमीन खचते. अखेरीस दरडी कोसळायला सुरुवात होते. तिसरे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे जोशीमठ गावात होत असलेली अनियंत्रित बांधकामे हे आहे. या गावाचे असणारे धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व मोठे असल्याने या गावामध्ये अविचारी पद्धतीने मोठ्या प्रमाणात बांधकामे होत आहेत. या भागात पहिली भूस्खलनाची घटना १९७६ मध्ये नोंदवण्यात आली. तेव्हाच याचे गांभीर्य लक्षात आले होते. उत्तर प्रदेश सरकारने मिश्रा समितीचे गठण केले. या समितीने त्याचवेळी डोंगरांना भेगा पडत असल्याचे निदर्शनास आणले होते. जोशीमठ आणि आजूबाजूच्या परिसरातील झाडाची तोड मोठ्या प्रमाणात करण्यात येत होती. झाडे तोडून रस्ते बांधण्यात येत होते. बांधकामे करण्यात येत होती. मात्र, मिश्रा समितीच्या अहवालातील वृक्षतोड पूर्णपणे थांबवणे आणि विकास काळजीपूर्वक करणे आवश्यक असल्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. जोशीमठ परिसरातील टेकड्यांच्या पायथ्याशी कोणताही बदल न करण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, आजही मोठ्या प्रमाणात वृक्षतोड आणि रस्ते, घरांच्या बांधकामात खंड पडलेला नाही. या रस्त्यावर अवजड वाहने धावतात. त्यामुळेही डोंगरांची हानी होते. त्यातही कामाचा उरक व्हावा या हेतूने अवजड पोकलँडसारख्या यंत्रांचा वापर करण्यात येतो. अशा यंत्रांच्या हादऱ्याने मुळातच मातीमिश्रीत टेकड्या खिळखिळ्या होतात. भेगा रूंद होत जातात. त्यात सांडपाणी आणि पावसाचे पाणी या भेगांना आणखी रूंदावतात. परिणामी टेकड्या, कडे कोसळत राहतात. जोशीमठ भागातच ५२० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत मोठा बोगदा खोदण्याचे काम सुरू आहे. या बोगद्याच्या कामामध्ये टीबीएम (टनेल बोअरिंग मशीन) तंत्राचा वापर करण्यात येत आहे. या तंत्रामध्ये स्फोटकांचा वापर करण्यात येत नसल्याने जोशीमठवर परिणाम होणार नाही, असा तंत्रज्ञांचा दावा होता. मात्र २००९ मध्ये ११ किलोमीटर काम झाल्यावर प्रथम हे मशीन पहिल्यांदा बोगद्यात अडकले. आजपर्यंत अनेकदा हे यंत्र बोगद्यात अडकले. याचाच अर्थ वरचा डोंगर स्थिर नाही. तरीही २०२० पर्यंत बोगद्याचे काम सुरूच ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे हेलांग मारवाडी बायपास रस्त्याचे बांधकामही सुरू होते. स्थानिकांचा या प्रकल्पांना विरोध आहे. आज हे काम तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुन्हा नवी समिती गठीत करण्यात आली आहे.

मात्र, आता वेळ निघून गेली आहे. कलियुगात जोशीमठ दिसणार नाही, असा उल्लेख एका पुराणात असल्याचे सांगण्यात येते. आज जोशीमठची ही अवस्था निसर्गापेक्षा मानवी विकासाच्या अविचारी संकल्पनामुळे झाली आहे. निसर्गातील अमानवी हस्तक्षेपामुळे झाली आहे. महाराष्ट्रातील कोकणाबाबतही हा एक इशाराच आहे, हे ओळखून विकासकामे व्हायला हवीत.

संपर्क : ९६७३७८४४००

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2023
तरुण भारत

# संशोधनासाठी संस्थांनी एकत्र यावे

- मनिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कुलसचिव डॉ. विनोद थॉमस यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या स्तुती उपक्रमांतर्गत प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना सुविधा मिळतात. त्यासाठीचा काय प्रयत्न केले पाहिजेत याचा मार्ग आपोआप सापडतो. तसेच स्वतःच्या संशोधनासाठी आणि कल्पनांसाठी मार्गदर्शन सुरू करता येईल. त्यामुळे संशोधनासाठी प्रतिथयश संस्थांनी एकत्र यावे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मूल्यमापनचे कुलसचिव डॉ. विनोद थॉमस यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम मणिपाल येथील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठातील स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी स्तुति कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक भारतभर वाढत असल्याचे सांगितले. काश्मीरपासून ते केरळपर्यंत शिवाजी विद्यापीठाने स्तुती उपक्रम पोहोचवला आहे. अनेक राज्य विद्यापीठांसह जोधपूर आणि इंदोरच्या आयआयटी, लखनऊ आणि पुदुच्चेरीच्या केंद्रीय विद्यापीठापर्यंत पोहोचून स्वतःचे साम्राज्य व आपले अभिमानास्पद विद्यापीठ यांचा परिचय करून दिला आहे. येथील प्रशिक्षण कार्यक्रमात ७ दिवस विविध प्राध्यापक मंडळी प्रगतशील उपकरणांची तांत्रिक माहिती देणार आहेत. मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अनिल राणा यांनी संस्थेला ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भारताचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचे आभार मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक, आसाम आणि तामिळनाडू येथील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवल्याबद्दल आभार मानले. मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. मोहन राव, प्रा. सुमा राव, डॉ. इस्माईल, डॉ. गुरुमूर्ती, डॉ. सुधाकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये स्तुती कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. सुमा राव, डॉ. अनिल राणा, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. मोहन राव, डॉ. इस्माईल, डॉ. विनोद थॉमस.**